असा. क्र. ८ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, फेब्रुवारी १७, २००६/माघ २८, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३.**—महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश . . | ३४-३६ |

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ फेब्रुवारी २००६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. III OF 2006.**

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL LANDS (CEILING ON HOLDINGS) ACT, 1961.

**सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३.**

**महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

१९६१ चा महा. २७.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :---

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अध्यादेश, २००६ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २८-१अअ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ याच्या कलम २८-१अअ मधील, पोट-कलम (३) मध्ये, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :--- १९६१ चा महा. २७.

" परंतु तसेच, ज्या व्यक्तीने महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २००१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अशी जमीन परत मिळण्यासाठी अर्ज केला नव्हता किंवा ज्या व्यक्तीने उक्त कालावधी नंतर अशी जमीन परत मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे, अशा व्यक्तीने, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अध्यादेश, २००६ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अशी जमीन परत मिळण्यासाठी अर्ज केल्यास, ती व्यक्ती अशी जमीन परत मिळण्यास पात्र होईल. ". २००३ चा महा. १७. २००६ चा महा. अध्या. ३.

## निवेदन.

महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २००१ (२००३ चा महा. १७) द्वारे, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा. २७) याच्या कलम २८-१अअ मध्ये सुधारणा केली होती आणि त्याद्वारे, ज्या व्यक्तींनी पूर्वी आपली जमीन एखाद्या उपक्रमास पट्ट्याने दिली होती, अशा पूर्वीच्या (सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नसलेल्या), पट्टाकारांना (खंडकऱ्यांना) वैयक्तिक लागवडीसाठी, त्याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटींस व शर्तीस अधीन राहून, शिल्लक जमिनीचा भाग परत देण्याचा अधिकार राज्य शासनाला प्रदान केला होता. तथापि, उक्त, पोट-कलम (३) अन्वये, पूर्वीच्या पट्टाकारांनी, अशा जमिनी परत मिळण्यासाठी उक्त सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या प्रारंभापासून म्हणजेच दिनांक २० मे २००३ पासून ९० दिवसांच्या कालावधीत सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करणे आवश्यक करण्यात आले होते. दरम्यानच्या काळात, मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने पूर्वीच्या पट्टाकारांना जमीन देण्याबाबत " जैसे थे स्थिती " ठेवावी असा आदेश दिल्यामुळे, बहुतांश पट्टाकारांनी, जमीन परत मिळण्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडे नेमून दिलेल्या कालावधीमध्ये अर्ज सादर केले नव्हते. परिणामी, उक्त अधिनियमामध्ये सुधारणा करण्याचे शासनाचे प्रयोजन साध्य होऊ शकले नाही. अलिकडेच उच्च न्यायालयाने दिवाणी अर्ज निकालात काढल्यामुळे, शासनाला, उक्त कलम २८-१अअ मध्ये योग्य त्या सुधारणा करून पूर्वीच्या पट्टाकारांना जमीन परत मिळण्यासाठी अर्ज सादर करण्याची संधी देणे इष्ट वाटते.

२. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १४ फेब्रुवारी २००६.

**एस. एम. कृष्णा.**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एस. शहजाद हुसैन,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.